# अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील जीवन संघर्ष

प्रा. जी. आर. वाघमारे

महाराष्ट्राच्या पवित्र भुमीने अनेक थोर सुपुत्रांना जन्म दिला. त्यापैकीच वारणेच्या खोऱ्यात वाटेगावी गावकुसाबाहेर निवडूंगाच्या बन्नात वालूबाई भाऊराव साठे यांच्या पोटी ०१ ऑगस्ट १९२० रोजी एक क्रांतीरत्न जन्माला आले. ते म्हणजे साहित्य सम्राट " अण्णा भाऊ साठे."

दीड दिवस शाळा शिकून संपूर्ण जगाला साहित्याचा खजीना पुरविणाऱ्या अण्णाभाऊंनी आपल्या संबंध साहित्यातील नायक - नायिका स्वाभिमानी, संघर्ष व अन्यायाचा प्रतिकार करणारी रेखाटली आहेत.ग्रामीण भागातील जातीव्यवस्था आणि भांडवलदारी व्यवस्थे विरुद्ध शोषित माणूस संघर्ष करतांना त्यांच्या कथा - कादंबऱ्यातून आविष्कृत झाला आहे. प्रस्थापित आणि विस्थापित यांच्यातील अस्तित्वा साठीच्या रोमहर्षक संघर्षाचा इतिहास म्हणजे अण्णाभाऊंचे साहित्य होय. कष्ट करणारा, माणूस म्हणून सन्मानाने जगण्यासाठी संघर्षरत असणारा शोषित, उपेक्षित माणूस हा अण्णाभाऊंच्या कथा, कादंबरी, गण, लोकनाट्ये अशा संबंध साहित्य लेखनाचा केंद्रबिंदू आहे. त्यांच्या साहित्यातून कोणत्या ना कोणत्या कारणाने सतत संघर्ष करणारी माणसं वाचकाला भेटतात. म्हणूनच " जीवन संघर्ष " हा अण्णाभाऊंच्या साहित्याचा आत्मा आहे, असे वाटते.

' खुळंवाडी ' हा अण्णाभाऊंचा पहिला कथासंग्रह आहे. या मधील ' बंडवाला ' ही कथा तात्या मांगाचा संघर्ष घेऊन येते. गावातील इनामदार हा तात्या मांगाची जमीन हडप करतो. त्यामुळे इनामदारा बद्दल तात्याच्या मनात प्रचंड चीड निर्माण होते. आपल्या आज्याच्या भोळेपणाचा फायदा घेऊन इनामदाराने जमीन बळकावली म्हणून तात्या पेठून उठतो. खरडाभाकरी खाऊन मरण्यापेक्षा जमीन मिळवण्यासाठी संघर्ष करून मरणे काय वाईट आहे, असे त्याला वाटते. बस्स उद्यापासून आपण जमिसाठी ' बंडवाला व्हायचे.' त्याने आपल्या मनात पक्का निर्धार केला. एका रात्रीत तो बंडवाला झाला. इनामदाराला जखमी करूनही तो आपली जमीन परत देत नाही म्हणून त्याचा वाडाच पेटवून देतो. त्यामुळे त्याला शिक्षा होते. शेवटी तात्या शिक्षाभोगून तुरुंगातून बाहेर येतो. परंतु तेंव्हा तो थकलेला असतो. तरीही त्याच्या आगमनाच्या बातमीनं सारा गाव थरारुन गेला. परंतु तात्याची बंडखोर वृत्ती दबली होती. निखाऱ्यावर राखेचा थर जमावा तसा तो दिसत होता. परंतु निखारा लौकर विझत नसतो, तो पुन्हा फुलतो म्हणतात." हा कथेचा

शेवट तात्याच्या अंतरंगात धगधगत असलेली संघर्षाची ज्वाला अण्णाभाऊंनी अत्यंत प्रभावीपणे रेखाटली आहे.

**सुलतान** :-

मानवी जीवनातील दारिद्र्याचे, दैन्याचे प्रभावी चित्रण घेऊन येणारी कथा म्हणजे ' सुलतान ' होय.जन्माने मुसलमान असलेला हा सुलतान कामाच्या शोधात वनवन फिरतो. हाटेलात काम करण्याचा तो प्रयत्न करतो, परंतु त्यांच्या आहाराला पाहून हाटेलचा मालक मुसलमान असूनही हाकलून देतो.' तर पोटासाठी चोरी करण्याचा सल्ला पोलिस त्याला देतात. कारण गुन्हा ( चोरी ) केल्या शिवाय अटक करता येत नाही असे पोलिसांचे म्हणणे असते. परंतु सुलतान मी मरण पत्कारेन पण चोरी करणार नाही असे म्हणतो. शेवटी या जगाला आपली गरजच नाही असे समजून जीव देण्यासाठी तो रेल्वेच्या रुळावर आडवा पडतो त्यामुळे ३०२ कलमांतर्गत त्याला तुरुंगात जावे लागते. परंतु तेथेही त्याला पोटभर अन्न मिळत नाही. त्यामुळे सुलतान बंडाने पेटून उठतो, आणि जेलरला म्हणतो "मी माझं पोटभराव म्हणून पुष्कळ प्रयत्न केला. जीव सुद्धा देण्यास मी तयार झालो हे लक्षात असू द्या. जर मला इथ पोटभर अन्न मिळालं नाही तर मी वाटेल ते करीन. आता मी मरणार ही नाही, मग काय करीन ते ओळखा." हा सुलतानचा विद्रोही संघर्षाचा पवित्रा पाहून जेलर त्याला दोन भाकरी वाढवून देतो. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजाही स्वतंत्र्यानंतर पूर्ण होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे सुलतान सारखी माणसं बंड करून उठतात हे अण्णाभाऊंने अतिशय प्रभावीपणे या कथेतून मांडले आहे.

**स्मशानातील सोनं** :-

एक दर्जेदार आणि लोकप्रिय अशी कथा म्हणजे ' स्मशानातील सोनं ' होय, वारणा खोऱ्यातला बलदंड देहाचा भिमा कामाच्या शोधात मुंबईला जातो. मुंबईच्या उपनगरातील दगडाच्या खाणीत त्याला काम मिळाले. त्यामुळे तो संतूष्ट होता. परंतु सहाच महिन्यात ती खाण बंद पडली आणि भिमावर बेकारीची कुऱ्हाड कोसळली. खाण बंद झाल्याची वार्ता ऐकून भिमा भांबावला.--- उपासमार त्याच्या पुढे नाचू लागली. क्षणात तो विवंचनेच्या डोहात बुडाला. आता उद्या काय हा एकच प्रश्न स्वतः ला विचारु लागला आणि उद्विग्न मन:स्थितीत तो घराकडे निघाला. तोच त्याची नजर एका राखेच्या ढिगाऱ्यावर स्थिरावली. त्या राखेच्या ढिगावर काही तरी चमकलं तसा भिमा पुढे झाला. त्याने वाकून ती राख निरखून पाहिलं. तिथं एक सोन्याची अंगठी होती. ती चटकन उचलून भिमान करकचून मूठ दाबली. त्याला आनंद झाला,' एक तोळा सोनं आणि

तेही मढयाच्या राखेत, याचा त्याला हर्ष झाला. मढयाच्या राखेत सोनं असतं याचा त्याला नवा शोध लागला. आणि जगण्याचा नवा मार्ग सापडला. आणि दुसऱ्याच दिवसापासून भिमा मसणवट्यात सर्वत्र हिंडू लागला.

प्रेताची राख जमवून बाळी, मुदी,नथ,पुतळी,वाळा असे काहिना काही घेऊन रोज येऊ लागला. भिमाचा हा नवा उद्योग जोरात सुरु होता.' अशाच एका भयाण रात्री प्रेतावरचे सोने मिळवण्याच्या इराद्याने भिमा घरा बाहेर पडतो. मसणवट्यात गेल्या नंतर काही कोल्ही एकत्र येऊन प्रेत उकरुन काढत आहेत हे त्याच्या लक्षात येते,' त्या कोल्हयावर भिमा चिडून हल्ला करतो. कोल्हे आणि भिमा यांच्यात लढाई सुरू होते,' क़ल्ही पराभूत होऊन आजूबाजूला गुरगुरत जातात. इतक्यात भिमा खडयात उतरून प्रेताच्या बोटातील अंगठी काढून घेतो व प्रेताच्या तोंडातले सोने काढण्यासाठी प्रेताची दातखिळी काढून आत हात चालताच कोल्ही भिमावर हल्ला करतात,' यात भांबावलेल्या भिमाने हातातील लोखंड प्रेताच्या टाळूवर जोराने मारले आणि त्या दणक्यानं त्याची दोन बोटं तुटली.

आणि त्याच दिवशी खाणीचं काम पुन: सुरू झाल्याची बातमी आली. ती ऐकून अंगात हत्तीचं बळ असणारा भिमा लहान मुलाप्रमाणे रडू लागला. कारण डोंगर फोडणारी ती दोन बोटं तो स्मशानातील सोन्यासाठी गमावून बसला होता,' पोटासाठी माणसाला किती टोकाचा संघर्ष करावा लागतो हेच या कथेतून अण्णाभाऊंने अत्यंत प्रभावीपणे रेखाटले आहे.

**चंदन :--**

एका कामगार स्त्रीचे संघर्षमय जीवनदर्शन घडविणारी 'चंदन 'ही कादंबरी अण्णा भाऊंनी लिहिली. सातारा जिल्ह्यातील एका शेतमजूराच्या घरी चंदनचा जन्म झाला. तिच्या जन्मापूर्वीच वडिलांचा मृत्यु आणि दोन वर्षाची असताना आईचा मृत्यु झाला. आई - वडीलाविना पोरकी झालेली चंदन मामाच्या मुलामध्ये लहानाची मोठी झाली. वयाच्या बाराव्या वर्षी मानगावच्या जगूशी तिच्या मामाने लग्न लावून दिले. अवघे चौदा वर्षे वय असताना तिला मुलगाही झाला. घरातील दारिद्रयाला कंटाळून कामाच्या शोधात चंदन,जगू व राजा मुंबईच्या घाटकोपरला आले. तिथे जगूला डोंगरफोडण्याचे काम मिळाले. व त्यांचा संसार हळूहळू उभा राहत होता. अशातच खाणीत स्फोट होतो. व या स्फोटात जगू कायमचा बेपत्ता होतो. त्यामुळे चंदन निराधार होते. आता पुढे करायचे, जगायचे कसे, असे अनेक प्रश्न तिला भेडसावत असतात. शेवटी पोटासाठी दयाराम काम करु लागते. परंतु पहिल्याच दिवशी, रंग्या दयाराम, झिंगऱ्या गोपाळ, टायगर या विसनांध पुरुषांची तिच्यावर विईट नजर पडते. ते चंदनसाठी आपापसात भांडणं करतात. टायगर चंदनला

ट्रकमधून पळवून नेण्याचा प्रयत्न करतो. परंतु त्यातून चंदन स्वतःची सुटका करून घेते. नंतर गोपाळ चाकूचा धाक दाखवून चंदनवर बलात्कार करण्याचा प्रयत्न करतो. यातूनही ती स्वतःची सुटका करून घेते. परंतु चंदनवर आणखी एक भयंकर संकट येते. दयाराम आपल्या कारखान्यात चंदनला कोंडून तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करतो. त्याचा प्रतिकार करताना चंदन अत्यंत धाडसाने दयारामच्या अंगावर ऑसिडटाकून सुटका करून घेते. परंतु ऑसिडटाकल्यामुळे तिला दोन वर्षाची शिक्षा होते. परंतु डॉ. जयवंत भोसले यांच्या प्रयत्नामुळे चंदनची तुरुंगातून सुटका होते. ती तुरुंगातून डोळ्यात अश्रू घेऊनच बाहेर पडते. चंदनचा हा जीवन संघर्ष अण्णाभाऊंनी अत्यंत समर्थपणे रेखाटला आहे.

**आवडी**:-

संरजामी प्रवृत्तीच्या लोकांमुळे आवडी सारख्या स्त्रीच्या वाट्याला कशा प्रकारे संघर्ष येतो, याचे प्रत्ययकारी चित्रण आवडी या कादंबरीत अण्णाभाऊंनी केले आहे. अण्णाभाऊंच्या साहित्यात येणारी मिणसं त्यांना कुठे ना कुठेतरी भेटलेली असतात. त्या माणसांचे जगणे-- मरणे नि त्यांचा संघर्ष त्यांनी अनुभवलेला असतो. म्हणूनच अण्णाभाऊंचे साहित्य हे काळजाला भिडणारे असते.

तांदळवाडीचा तात्याबा चौघुला हा कर्तबगार शेतकरी म्हणून ओळखला जातो. त्याला सारजा, नागू , आवडी, आन्या आणि सुभद्रा अशी पाच अपत्य होती. त्यांचा नागू हा मुलगा त्या भागातला प्रसिद्ध पैलवान होता. आपल्या पैलवानकीचा त्याला मोठा गर्व होता. आवडी आपल्या भावासोबत बोरगावच्या यात्रेला जाते, तिथे तिची व धनाजी रामोशी यांची भेट होते. धनाजी सुद्धा त्या भागातील नावाजलेला पैलवान असतो. आवडीला धनाजी मनातून आवडू लागतो. परंतु नाथाच्या यात्रेत नागू हा धनाजीकडून पराभूत होतो. त्यामुळे नागूच्या मनात धनाजी बद्दल प्रचंडचिड निर्माण होते. धनाजीचा राग नागू आवडीवर काढतो व आवडीचे लग्न बोरगावच्याच भगवानराव पाटलाच्या उत्तम नावाच्या मुलाशी लावतो.

आवडी लग्नानंतर नांदायला जाते, पहिल्याच दिवशी उत्तमला फेफरे येते. हे पाहून आवडीला मोठा धक्का बसतो. आपल्या भावाला सगळे माहीत असूनही त्यांने आपले उत्तमशी लग्न लावून दिले, याची तिला प्रचंड चीड येते. फेफरे येणाऱ्या नवऱ्या सोबत मी राहणार नाही असे ती आपल्या भावाला, आई - वडिलांना सांगते.परंतु ते तीचे ऐकत नाहित. शेवटी माहेरचे लोक आपल्यावर अन्याय करीत आहेत हे लक्षात येताच आवडी या सर्वांच्या विरोधात बंड करते व धनाजी रिमोश्याच्या घरी जाऊन त्याला आपला पती मानते.

त्यामुळे नागू चिडून आवडीचा खून करतो. आवडीचा हा जीवन संघर्ष अत्यंत प्रभावीपणे अण्णाभाऊने या कादंबरीतून रेखाटला आहे.

**फकिरा** :

अण्णाभाऊंच्या एकूण कादंबरी लेखनामध्ये फकिरा ही कादंबरी सर्वोत्तम समजली जाते. वारणा खोऱ्यात वाटेगाव हे बाराशे घरं असलेले एक गांव. या गावात जत्रा भरावी अशी शंकरराव पाटील यांची इच्छा असते. ही त्यांची इच्छा पूर्ण करण्यासाठी आणि वाटेगावच्या भल्यासाठी राणोजी मांग शिगावच्या जत्रेतील ज़गीण मोठ्या हिमतीने पळवितो. व शिगाव आणि वाटेगावामध्ये संघर्ष निर्माण होतो.

ज्या गावात जोगणी त्या गावात जत्रा असा नियम असतो. जत्रा भरल्यामुळे गावाची भरभराट होते, असा लोकांचा समज असतो. त्यामुळे वाटेगावचा राणोजी मांग शिगावमधील जत्रेत घुसून मोठ्या धाडसाने जोगणी मिळवतो. राणोजी जोगणी घेऊन वाटेगावच्या शिवंमध्ये आलेला असतानाही रिवाज मोडून बापू खोत राणोजीचे शीर धडापासून वेगळे करतो. राणोजी वाटेगावसाठी शहिद होतो. अशा लढाऊ, शुर- विर आणि त्यागी राणोजी मांगाचा पराक्रमी मुलगा म्हणजे फकिरा. हा फकिरा राणोजी सारखाच शुर-विर आणि बंडखोर आहे. त्याला अन्यायाची, अत्याचाराची प्रचंड चीड आहे. म्हणूनच तो एकाचवेळी जातीव्यवस्थे विरुद्ध, इंग्रज सरकार विरुद्ध आणि मांग - महाराच्या वाट्याला आलेल्या भिषण दारिद्रयाच्या विरुद्ध संघर्ष करित असतो.

साथीच्या रोगाने आणि भुकेने व्याकूळ होवून अन्न - अन्न करून मरणाऱ्या माणसांना वाचवण्यासाठी विष्णूपंत कुलकर्णी कडे जाऊन फकिरा म्हणतो, मांगाम्हारांचा वंशच उरत न्हाय आबा ! " चार दिसांत बारीक - मोठी ईस . गेलेत " भाकरी - भाकरी करून पोरांचं चरफडून मरनं आणि त्यांचा तो हंबरडा आता माझ्यानं ऐकवना. फकिराचे हे शब्द ऐकून आपल्या धीरगंभीर आवाजात पंत म्हणतात काहिही करा पण जगा असं कुत्र्या - मांजरा सारखे मरू नका. पंताचे हे शब्द ऐकताच फकिरा घराकडे निघाला. फकिराची वाट पाहत मांगवाड्यातील व म्हारवाड्यातील बरीच मंडळी बसली होती. फकिरा घरी जाताच सर्वांनी एकच प्रश्न केला पंत काय म्हणाले. त्येनी जगाय सांगितलय." फकिरा म्हणाला. पंतानी दुष्काळाची व साथीच्या रोगाची माहिती सरकारला दिली आहे. पण ह्या कुंभकर्णाच्या अवलादीला जाग येत नाय. आता आपूनच तलवार घेऊन त्येंच्या उरावर नाचलं पाहिजे. असे म्हणून फकिरा चपळाईने घरात गेला व तलवार घेऊन बाहेर आला. त्याच्या हातातील ती नंगी तलवार बघून सर्वांच्या छातीत हत्तीचं बळ खवळून उठलं. फकिरा एक एक नाव उच्चारु लागला. साधू , बळी , मुरा , करु , सावळूनाना , घमांडी , तायनू महार , केसू

महार , सुकाना , भाना - - -आणि ज्यांच्या पायात बळ नि ऊरात हिम्मत असंल त्यानं माझ्या सोबत हत्यार घेऊन निघावं ! त्याचा हुकमी आवाज ऐकताच घोंगावत आग्यामोहोळ उठाव , तद्वत शे- दीडशे माणसं हत्यार घेऊन माळेवाडीचा मठ लुटायला निघाली. माळेवाडीचा मठ व नंतर सरकारी खजिना लूटून त्यातील धान्य व पैशाची समप्रमाणात फकिरा वाटणी करतो. यामुळे फकिरा हा समतावादी व स्वातंत्र्यप्रीय नायक वाटतो. प्रस्थापित व्यवस्थेला हादरे देत शोषितांच्या न्याय हक्कासाठी तो संघर्ष करतो. जातीयव्यवस्था , सरकार , दुष्काळ आणि साथीचा रोग यांच्या विरुध्द प्रभावीपणे संघर्ष करणारा फकिरा अण्णाभाऊंनी या कादंबरीतून समर्थपणे रेखाटला आहे.

**माकडीचामाळ** :-

ग्रामीण जीवनाच्या पार्श्वभूमीवर फिरत्या जमातींचे प्रश्न घेऊन येणारी ही कादंबरी आहे. गावकुसा बाहेर पाल ठोकून जीवन जगणाऱ्या फिरत्या जमाती आणि त्यांचे प्रश्न हा " माकडीचा माळ " या कादंबरीचा विषय आहे. माकडवाले , दरवेशी, फासेपारधी, नंदीवाले अशा फिरत्या जमातींच्या व्यथा - वेदनांचे, संघर्षांचे चित्रण अण्णाभाऊंनी केले आहे. विविध पशु - पक्षांचा, प्राण्यांचा आधार घेऊन जगणारी ही माणसं कशी अस्थिर असतात हे या कादंबरीतून लक्षात येते.

पाऱ्याचं फिसाळलेलं कुत्र यंकू माकडवाल्यानं मारलं होतं त्यामुळे यंकूचा बदला घेण्याचा पाऱ्यांनी चंगबांधला. आपल्या तरण्या पोरींना पुढे करुन गल्य - बल्या दरोडे खोरास दारू पाजून यंकूला मारण्याची सुपारी दिली होती. परंतु यंकूनी ही माहिती नाथा पाटलाला दिल्यामुळे नाथा पाटील गावातील माणसं घेऊन गल्या - बल्या या फरार गुन्हेगाराला पकडण्यासाठी माळावर दबा धरून बसले होते. गल्या नि बल्या यंकूच्या पालाजवळ येताच दबा धरून बसलेल्या नाथा पाटलांच्या माणसांनी अचानक हल्ला केला. त्यात नाथा पाटलाच्या गोळीनं बल्या आणि तेल्याच्या गोळीनं गल्या जखमी झाले. त्यांना घेऊन नाथा पाटील चावडीकडे गेले; इकडे माळावरील सर्व भिकारी या प्रकारामुळे भयभीत होवून माळ सोडून जात होती. तोच गल्या - बल्याच्या पाचपन्नास माणसांनी पाऱ्याला गराडा दिला. एकजण त्याचा पाय ओढीत म्हणाला तुच गल्या - बल्यास पकडून दिलसं. एवढयात दुसऱ्यानं मांडीजवळ कुऱ्हाड हाणली व पाऱ्याचा एक पाय मांडीपासून वेगळा केला. इतक्यात तिसरा इसम पुढं झाला. त्यानं थोरल्या पोरीला पुढं ओढली. " हिनंच दगा दिला. अस म्हणून त्यानं खसकन

तिच नाक कापलं.

यंकू माकडवाल्यासह सख्या, हिकम्या, बाळ्या, पाऱ्या ही सर्व भिकारी काळगावाहून राधानगरीला आली होती. त्यांनी राधानगरीच्या माळावर आपली पालं ठोकली होती, पाऱ्या तिथेही यंकूचा खून करून व दुर्गाचं शिल लूटून बदला घेण्याचा प्रयत्न करीत होता. सख्या माकडवाल्याचा मुलगा यमू आणि दुर्गाची सोयरीक जमली होती. त्यांचं एकमेकावर अपार प्रेम होतं. परंतु यंकूची देखणी दुर्गा राधानगरीच्या इनामदाराच्या मनात बसली होती. त्याला पाऱ्याचीही चिथावणी होतीचं इनामदारांनी राव्या आणि बंड्या मार्फत दुर्गाला पळवून रंगराव पाटलाच्या वाड्यावर डांबून ठेवली होती. परंतु अचानक आलेल्या काळगावच्या नाथा पाटलाला हा प्रकार समजताच त्यांनी दुर्गाची सुटका केली. व म्हणाले इथली माणसं माणसं नसून हैवान आहेत तेंव्हा तुम्ही गरीब भिकारी इथं राहू नका. काळगावला चला.

रातोरात सर्व भिकारी काळगावला गेली. काळगावच्या त्या विस्तर्ण भूताच्या माळावर राहू लागली. परंतु तिथेही पाऱ्या यंकूचा सुड घेण्याचा प्रयत्न करीत होता; आता वैशाख महिना उजाडला होता; यंकू दुर्गाच्या लग्नासाठी पै - पै जमवून तीन हजार रुपये जमा केला होता. यमू आणि दुर्गाच्या लग्नाचा दिवस ठरला होता. इकडे पाऱ्यानं यंकूकडे तीन हजार रुपये असल्याची माहिती गल्या - बल्या दरोडेखोरांना दिली. दुर्गाच्या लग्नाचा दिवस उजाडला, आता माझ्या दुर्गाचं लग्न होणार आणि दुर्गा व यमूचा सुखी संसार करणार या विचारानं तो आनंदून गेला होता. दुर्गाचं लग्न झालं परंतु त्याचं दिवशी गल्या - बल्यानी यंकूवर हल्ला करून यंकूचा केला, व तीन हजार रुपये घेऊन पसार झाले. खूनाची वार्ता समजताच दुसऱ्या दिवशी फौजदार माळावर आले', तेंव्हा यंकूचे इमानदार माकड गंग्याने सर्व गुन्हेगारांना पकडून दिले. व शेवटी आपल्या मालकाच्या गोरी जवळ प्राण सोडला,' आणि तेंव्हा पासूनच भूताच्या माळाचं नाव ' माकडीचा माळ ' पडले.

यंकूला दुष्ट पाऱ्यापासून वाचवण्यासाठी आणि दुर्गाला आपल्या देखण्या रुपामुळे राधानगरीचा इनामदार व रंगराव पाटला सारख्या वासनांध माणसां पासून आपल्या शीलाला जपण्यासाठी करावा लागणारा संघर्ष अण्णाभाऊंनी अत्यंत प्रभावी पणे रेखाटला आहे.

**खापऱ्या चोर:**

खापऱ्या चोर हे अण्णा भाऊ साठे यांचे दुसरे लोकनाट्य होय. 1946 मध्ये लिहिलेल्या या लोकनाट्यत सावकारी शोषणाचे चित्रण आले आहे. सनगरवाडीचा दाजीबाजी हा भोलाराम सावकाराकडून फसला जातो. पुढे हाच दाजीबाजी खापऱ्या चोर म्हणून ओळखला जातो. या भोलाराम सावकाराने अनेकांच्या जमीनी बळकावलेल्या असतात. खापऱ्या चोर या भोलारामाच्या घरी चोरी करतो. आणि या चोरीच्या प्रकरणात तो

गावच्या पाटलालाही गोवतो. व भोलाराम कडून स्वतःची व सीताची जमीन सोडवून घेतो. या लोकनाट्यात शोषण करणारा भोलाराम आणि शोषणाचा प्रतिकार करणारा खापऱ्या चोर म्हणजेच शोषक आणि शोषित यांच्यातला संघर्ष अण्णाभाऊंनी अत्यंत प्रभावीपणे मांडला आहे.

**माझी मुंबई:**

गुजराती माणसांचं प्रतिक म्हणजे मुनीमंजी आणि मराठी माणसाचं प्रतिक म्हणजे विष्णू यांच्यातील मुंबई मिळवूण्यासाठीचा संघर्ष या लोकनाटयातून रेखाटला आहे.

अण्णाभाऊ म्हणजे मुंबईसाठी लढणारा योध्दाच. मुंबई म्हणजे त्यांना कामगाराची रणभूमीच वाटते. कारण याच मुंबईत ' लालबावटा कलापथक स्थापन करून त्यांनी सामाजिक परीवर्तनाच्या लढाईला सुरुवात केली. अशी ही जीवाभावाची मुंबई महाराष्ट्रापासून तोडून गुजरातला जोडण्याचा कट शिजत होता. ही माहिती अण्णाभाऊंना समजल्यानंतर त्यांनी हा राजकारण्यांचा अर्थात मोरारजी देसाई सरकारचा कुठील डाव उद्ध्वस्त करण्यासाठी कलापथकाच्या माध्यमातून समाज प्रबोधनकेले.

जशी गरुडाला पंख । आणि वाघाला नखं ।
तशी ही मुंबई मराठी मुलखाला. ।।

आकाशात उंच भरारी घेण्यासाठी गरुडाला जशी पंखांची आवश्यकता आहे. आणि वाघाला आपले वाघत्व सिद्ध करण्यासाठी नखांची आवश्यकता आहे. तद्वतच मुंबई ही मराठी मुलखाला आवश्यक आहे. अशा या अण्णाभाऊंच्या समाज प्रबोधनाने संयुक्त महाराष्ट्राची चळवळ अधिक व्यापक झाली. म्हणून अण्णाभाऊ म्हणतात.

उठला मराठी देश । आला मैदानी त्वेष । वैरी करण्या नामशेष ।
गोळी डमडमची छातीवर साहिली । माझ्या जिवाची होतीया काहिली ।।

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ दडपून टाकण्यासाठी मोरारजी सरकारने आंदोलन कर्त्यावर गोळीबार केला. तरीही ही चळवळ न दबता अधिक व्यापक बनत गेली व शेवटी १०७ हुतात्म्यांच्या बलिदानाने मुंबई महाराष्ट्राला मिळाली.

माझी मुंबई या लोकनाटयातून मराठी माणसाला मुंबई मिळवण्यासाठी करावा लागलेला संघर्ष अण्णाभाऊंने अत्यंत प्रभावीपणे रेखाटला आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

०१) लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङ्.मय

०२) विद्रोही कलावंत - अण्णाभाऊ साठे.